# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ६० /२०१८ पुणे शहर, दिनांक- ३०/०४/२०१८

**विषय :- २९ वे रस्ता सुरक्षा अभियान २०१८ अनुषंगाने वाहतुक शाखेकडून विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले बाबत.**

---

२९ वे रस्ता सुरक्षा अभियान २०१८ दिनांक-२३/०४/२०१८ ते ०७/०५/२०१८ दरम्यान पुणे पोलीस दलाचे वाहतूक शाखेमार्फत पुणे शहरात राबविण्यात येत असुन 'रस्ता सुरक्षा अभियान २०१८ ' कार्यक्रमा निमित्त वाहतुक नियमांची जनतेमध्ये, वाहन चालकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होण्याकरीता तसेच शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित चालण्याकरीता आज दिनांक- ३० एप्रिल २०१८ रोजी पुणे शहरात मा. पोलीस आयुक्त, मा. सह पोलीस आयुक्त, व मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक विभागांचे सहा पोलीस आयुक्त व वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे विविध कार्यक्रम घेतले आहेत

**<u>तक्ता – रस्ता सुरक्षा अभियान – २०१८ चे अनुषंगाने विशेष मोहिम दि. २५/०४/२०१८ ते ३०/०४/२०१८ पर्यंत केलेली कारवाई</u>**

| हेड | केसेस | रक्कम |
|---|---|---|
| हेल्मेट | ५९४७ | २९,७३,५००/- |
| ट्रिपलसीट | ७९६ | १,५९,२००/- |
| मोबाईल टॉकींग | ११८९ | २,३७,८००/- |

१) कोंढवा वाहतुक विभागाने रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ अनुषंगाने धर्मावत पेट्रोलपंप, पिसोळी येथे वाहतुकीचे नियम पाळणा-या वाहनचालकांना स्टिकर वाटप करण्यात आले.

२) खडकी वाहतुक विभागात सीओईपी इंजिनियरींग चौकात इंजिनियरींग महाविद्यालयाच्या विद्यार्थी व वाहतूक पोलीस कर्मचारी यांचे मदतीने वाहन चालकांना रस्ता सुरक्षा अभियान – २०१८ पंधरवडा च्या निमित्ताने वाहतुक नियम प्रबोधनपर बॅनर, फलके दाखवुन प्रबोधन केले.

३) हडपसर वाहतुक विभागाने रस्ता सुरक्षा अभिआन-२०१८ अनुषंगाने गाडीतळ, भेकराईनगरचे पीएमपीएल बसडेपो येथील वाहनचालकांना वाहतुक नियमनाबाबत प्रबोधन करण्यात आले.

४) चिंचवड वाहतुक विभागाने रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ अनुषंगाने नेत्रचिकीत्सा शिबीर आयोजित करण्यात आले होते.

५) पिंपरी वाहतुक विभागाने रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ अनुषंगाने डॉ. सौरभ चावरे यांचे मदतीने पिंपरी विभागात डोळे तपासणी शिबीर घेण्यात आले.

६) खडक वाहतुक विभागाने पुरम चौक येथे ०५/०० ते ०६/३० वा. या वेळेत रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ पंधरवडा निमित्ताने माडीवाले कॉलनी, गणेश मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ५० बाय ५ फुटी कॅनव्हॉसवर ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांचेसोबत, स्थानिक नगरसेवक व ज्येष्ठ नागरिक संघ, सुभाषनगर यांचेवतीने वाहतुक नियमनाबाबत प्रबोधन करण्यात आले. श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक, परि-१ श्री ढमाले व खडक वाहतुक विभाग येथील कर्मचारी उपस्थित होते. या कॅनव्हॉसवर सर्व ज्येष्ठ नागरिकांनी अभिप्राय नोंदवले आहेत.

७) सांगवी वाहतुक विभागाने सांगवी वाहतुक विभागासमोर रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ पंधरवडा निमित्ताने पाणपोईचे उदघाटन केले. तसेच सेल्फी विथ यमराज तापकिर चौक, गोविंद गार्डन, सांगवी फाटा येथे यमराज व चित्रगुप्त यांच्या माध्यमाने वाहनचालकांना वाहतुक नियमनाबाबत माहिती दिली व वाहनचालकांनी यमराजसोबत सेल्फी काढली.

८) सहकारनगर वाहतुक विभागाने रस्ता सुरक्षा अभियान-२०१८ अनुषंगाने पासलकर चौकात वाहतुन नियमनाबाबत प्रबोधन केले व वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले. एकुण रिक्षा चालक १० व पोलीस कर्मचारी यांचे मदतीने कार्यक्रम घेण्यात आले. व येरवडा वाहतुक विभागाने अॅडलॅब चौकात श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, मॉलचे ओनर अमित बोरा व केएनआर ग्रुपचे नागरिक यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतुक नियमनबाबत प्रबोधन केले.